

झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था
केज संचलित,

# जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय, केज

## माहिती पुस्तिका
## 2025-2026



झुंजार बहुउद्देशिय सेवाभावी संस्था केज संचलित,

# जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय,केज

बीड रोड,केज,ता.केज,जि.बीड - 431123 (महा.)

## महाविद्यालयीन नियोजन व विकास समिती

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| ०१ | श्रीमती.फैमुम्विसा बेगम चाँदपाशा इनामदार | अध्यक्ष |
| ०२ | श्री.इनामदार हारुण चाँदपाशा | संस्था सचिव सदस्य |
| ०३ | इनामदार सादिया हारुण | संस्था कोषाध्यक्ष |
| ०४ | श्री.भागवत ढाकणे | विधीतज्ञ सदस्य |
| ०५ | श्री.आनंद बिरदीचंद बलाई | उद्योजक सदस्य |
| ०६ | श्री.एम.डी.घुले सर | शिक्षणतज्ञ सदस्य |
| ०७ | श्री.हनुमंत भोसले सर | शिक्षणतज्ञ सदस्य |
| ०८ | श्री.हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब | सचिव प्राचार्य |
| ०९ | श्री.ढाकणे रमाकांत आण्णासाहेब | सदस्य |
| १० | श्री.जाजु महेश रामेश्वरजी | सदस्य |
| ११ | श्री.विनायक तुकाराम ठोंबरे | सदस्य |
| १२ | श्री.केदार भगवान | सदस्य |
| | | |

# प्राचार्यांचे मनोगत....

प्रिय विद्यार्थी/विद्यार्थीनी

मला आनंद वाटतो की, वरीष्ट महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी तुम्ही झुंजार बहुउद्देशिय सेवाभावी संस्था संचलित जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालयाची निवड केली. त्याबद्दल तुमचे हार्दिक अभिनंदन करतो. मला व्यक्त होतांना अभिमान वाटतो की आपले महाविद्यालय शैक्षणिक वातावरणासाठी प्रख्यात असुन विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षीत करण्या-मध्ये अग्रेसर आहे. दर्जेदार शिक्षण,गुणवत्तेची परंपरा, विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष,नियमित तासीका,भव्य क्रिडांगण,स्पर्धा परिक्षा,मार्गदर्शन केंद्र यामुळे प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा फार मोठा कल आहे.

जुन 2019 पासुन केज व परिसरातील गरीब होतकरु मुला-मुलींना उच्च शिक्षण स्थानिक स्थरावर उपलब्ध व्हावे म्हणुन संस्था सचिव मा.श्री.हारुणभाई इनामदार यांच्या पुढाकाराने जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय सुरु करण्यात आले. या महाविद्यालयाचे नावलौकीक करणारा प्रत्येक विद्यार्थी सामाजिक बांधीलकी जोपासनारा,संविधानातील नैतिक मुल्यांचा आदर करणारा,वडीलधा-यांची अविरत सेवा करणारा,जिव्हाळा,सद्‌भावना व सद्‌गुण यांचा सुरेख संगम साधनारा घडला पाहिजे हे संस्थेचे उदिष्ट संचालंक मंडळाच्या सहकार्यातुन साकारणारा आहे.

उच्च शिक्षणातुन विद्यार्थ्यांच्या स्वावलंबनाचे साकार व्हावे म्हणुन संस्थेच्या माध्यमातुन समृध्द ग्रंथालय,भव्य क्रिडांगण,अद्यावत स्वरुपाचे संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा व इतर अनेक विद्यार्थी हितोपयोगी उपक्रम अशा सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करणारा व योग्य शैक्षणिक पात्रता असणारा प्राध्यापक वर्ग कार्यरत आहे. महाविद्यालयात उपलब्ध सुविधांचा उपयोग करुन स्वतःचे,आई-वडीलांचे,संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव उज्वल करण्यासाठी आपणास यशाचा मार्ग नक्कीच सापडेल अशी आशा बाळगतो व सर्वांना प्रगतीच्या शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देतो....

प्राचार्य
श्री.हंडीबाग दत्तात्रय
जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय,केज

# ✻ प्रवेशासंबंधी नियम ✻

बी.ए.,बी.एस.सी.,बी.कॉम वर्गांसाठी प्रवेश गुणवत्तेच्या आधारे आणि शासन,विद्यापीठ आणि व्यवस्थापन यांनी वेळोवेळी गेलेल्या नियमांप्रमाणे देण्यात येतील.

मा.प्राचार्यांना प्रवेशासंबंधी विशेष हक्क राखीव ठेवण्यात आले आहेत. शासन,विद्यापीठ आणि व्यवस्थापनाच्या आदेशाप्रमाणे प्राचार्य त्यांची अंमलबजावणी करतील.या संबंधी वेळोवेळी सुचना नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.

## प्रवेशासंबंधी प्रवर्गानुसार राखीव जागा पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वर्गवारी | टक्केवारी |
|---|---|---|
| | अनुसूचित जाती (S.C.) | १३ % |
| | अनुसूचित जमाती (S.T.) | ०७ % |
| | भटक्या जाती (N.T.)<br>VJNT (A-3,B-2.5,C-3.5,D-2) | ११ % |
| | इतर मागास वर्ग (O.B.C.) | १९ % |
| | विशेष मागास प्रवर्ग (S.B.C.) | ०२ % |
| | सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास (S.E.B.C.) | १६ % |
| | एकुण | ६८ % |

## प्रवेश पात्रतेचे नियम

१) बी.ए.,बी.एस.सी.,बी.कॉम प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) प्रवेशासाठी खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ) | फोटो | २ प्रती |
| ब) | शाळा,सोडल्याचा मुळ दाखला (T.C.) | २ सत्यप्रती |
| क) | दहावी,बारावी किंवा तत्सम परीक्षेचे गुणपत्रक (M.M.) | २ सत्यप्रती |
| ड) | जातीचे प्रमाणपत्र (C.S.) | १ सत्यप्रत |
| ई) | उपस्थिती हमीपत्र | १ सत्यप्रत |
| फ) | प्रवेश फार्म | १ सत्यप्रत |
| ग) | आधार कार्ड | १ सत्यप्रत |

३) विद्यार्थ्याने प्रवेशासंबंधी खालील दक्षता घ्यावी.

१) मुळ कागदपत्रांच्या अधिक सत्यप्रती स्वत:कडे ठेवाव्यात.

२) विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी सर्व पावत्या सांभाळून ठेवाव्यात.

३) सर्व प्रवेश तात्पुरते असतील प्राचार्यांच्या अधिकारात पडताळणी झाल्यानंतर प्रवेश कायम होतील.

## ※ ग्रंथालय ※

महाविद्यालयाचा कणा म्हणजे ग्रंथालय-

महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, राष्ट्रीय दैनिके, प्रादेशिक दैनिके उपलब्ध आहेत अध्यापकासाठी व विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात स्वतंत्र वाचनकक्ष आहे.

**ग्रंथालयाचे नियम :-**

१) ग्रंथालय सकाळी १०.०० ते सायं.५.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत सुरु/उघडे राहील. सकाळी १०.०० ते ४.३० या वेळेत पुस्तकांची देवाण-घेवाण करता येईल.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने ग्रंथालयात / वाचन कक्षामध्ये प्रवेश करताना त्यांच्याकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. कोणाही संबंधितांनी ओळखपत्र मागितल्यास त्यांनी दिले पाहिजे. ओळखपत्राद्वारे पुस्तकाची देवाण-घेवाण करण्यात येईल.

३) विद्यार्थ्यांकरिता वाचनकक्षाची सुविधा उपलब्ध आहे.

४) विद्यार्थ्यांनी पुस्तके / मासिक / वर्तमानपत्र काळजीपूर्वक हाताळावे ती फाडल्यास किंवा खराब झाल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल.

५) विद्यार्थ्यांना कार्डवर एकावेळी २ पुस्तके ७ दिवसांसाठी देण्यात येतील, ७ दिवसांनंतर पुस्तके परत नाही केल्यास प्रत्येक दिवसास १ रूपया याप्रमाणे दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल.

६) संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके किंवा कोणतीही महत्वाची पुस्तके यांची एकच प्रत महाविद्यालयात उपलब्ध असेल तर ते पुस्तक महाविद्यालयाबाहेर देण्यात येणार नाही.

७) पुस्तक फाडल्यास किंवा हरवल्यास पुस्तकाची किंमत दिडपट भरावी लागेल.

८) वार्षिक परीक्षेपूर्वी पुस्तके परत करणे आवश्यक आहे. परीक्षा कालावधीत पुस्तक हवे असेल तर पुस्तकाच्या किंमती इतकी अनामत रक्कम ग्रंथालयात जमा करून पुस्तक घेता येईल.

## ※ परीक्षेसंबंधी नियम ※

विद्यार्थ्यांनी घटक चाचणी / गृहपाठासाठी हजर राहणे बंधनकारक आहे. घटक चाचणी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात येईल.

※ महाविद्यालयीन परीक्षा

महाविद्यालयात शैक्षणिक सत्राच्या शेवटी विद्यापीठीय परीक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार घेण्यात येतील.

## ※ शिस्त आणि नियम ※

※ स्वयंशिस्त ही उत्तम शिस्त आहे.

※ विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात शिस्तीचे पालन करावे.

※ महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी ओळखपत्र नेहमी सोबत ठेवावे.

※ महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्यांना सोबत आणू नये.

※ विद्यार्थ्यांनी तासिका / प्रात्यक्षिक / कार्यक्रम यांना हजर राहावे.

※ महाविद्यालयातील परिसर, इमारत व फर्निचर यांची नासधूस करू नये.

※ महाविद्यालयाच्या परिसरात धुम्रपानास सक्त मनाई आहे.

※ महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल वापरास सक्त मनाई आहे.

※ विद्यार्थ्यांनी खेळ/शिबीर/सांस्कृतिक कार्यक्रम/वादविवाद स्पर्धा इत्यादी कार्यक्रमात प्राध्यापक/कार्यक्रम अधिकारी/संघ व्यवस्थापक यांच्या आदेशाचे पालन करावे.

**वरील नियम व शिस्तीचे पालन महाविद्यालयातील विद्यार्थ्याने काटेकोरपणे करावे. जे या नियमांचे पालन करणार नाहीत, त्यांच्यावर महाराष्ट्र शासन व विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.**

## ∗ रॅगिंग प्रतिबंध ∗

सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आणि महाराष्ट्र शासन पत्रक क्र.२००५ (२८८/०५) दि.१८ जुलै २००७ नुसार महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना रॅगिंगसाठी प्रतिबंध घालण्यात आला आहे. जर कोणी विद्यार्थी / विद्यार्थिनीने महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी किंवा घेतल्यानंतर कोणतीही गलिच्छ किंवा नियमबाह्य वैयक्तिक हरकत केल्यास त्याचा प्रवेश तात्काळ नोटीस देऊन रद्द करण्यात येईल.

## ∗ महाविद्यालयातील विविध उपक्रम ∗

महाविद्यालयात नियमित खालील उपक्रम आयोजित करण्यात येतात.

अ) सांस्कृतिक कार्यक्रम :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सव आणि स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने महाविद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अशा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

ब) राष्ट्रीय सेवा योजना :

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे दीड युनिट असून त्यात १५० विद्यार्थ्यांचा अंतर्भाव आहे. या युनिटच्या अंतर्गत प्रत्येक वर्षी एक विशेष शिबीर आयोजित केले जाते व नियमित शिबीर घेतले जाते.

क) क्रिडा उपक्रम :

महाविद्यालयाचे स्वत:चे भव्य क्रिडांगण असून खेळाच्या उपक्रमासाठी सर्व सोयी व साहित्याचा विद्यार्थ्यांना पुरवठा करून त्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. त्यात क्रिकेट, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल,अॅथेलॅटीक यासारख्या खेळांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांनी या खेळांमध्ये भाग घेवून आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करून घ्यावा.

## ∗ विद्यार्थी कल्याण योजना ∗

**अ. शिष्यवृत्त्या आणि मोफत फिस :**

बी.ए.साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना खालील योजनांचा लाभ घेता येईल.

१) भारत सरकारची शिष्यवृत्ती.

२) विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती.

३) स्वातंत्र्यसैनिक (फ्रिशिप)

४) माजीसैनिक (फ्रिशीप)

५) प्राथमिक / माध्यमिक (फ्रिशीप)

**ब. विमा :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या फायद्यांची सर्वसाधारण विमा योजना उपलब्ध आहे. या योजनेखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्यांकडून २ रु./-प्रमाणे विमा घेतला जातो.

**क. मोफत वैद्यकीय सेवा :**

महाविद्यालयाच्या वतीने मोफत वैद्यकीय सेवा दिली जाते. ही सेवा शासकीय आरोग्य सेवेच्या मार्फत दिली जाते.

# * प्रवेश शुल्क तक्ता *

| अ.क्र. | शुल्क तपशील | बी.ए. | बी.एस्सी | बी.कॉम. |
|---|---|---|---|---|
| ०१ | माहिती पुस्तीका | ५० | ५० | ५० |
| ०२ | नोंदणी शुल्क | २५ | २५ | २५ |
| ०३ | वैद्यकीय तपासणी | १५ | १५ | १५ |
| ०४ | ओळखपत्र | १० | १० | १० |
| ०५ | प्रवेश शुल्क | ५० | ५० | ५० |
| ०६ | वार्षिक अंक | ५० | ५० | ५० |
| ०७ | स्नेहसंम्मेलन | ५० | ५० | ५० |
| ०८ | विद्यार्थी मदत निधी | १० | १० | १० |
| ०९ | महाविद्यालय परिक्षा शुल्क | ७५ | ७५ | ७५ |
| १० | महाविद्यालय विकास निधी | ११० | ११० | ११० |
| ११ | युवक महोत्सव | १०० | १०० | १०० |
| १२ | शैक्षणीक शुल्क (विनाअनुदानीत) | १६०० | २००० | १६०० |
| १३ | जिमखाना (क्रिडा शुल्क) | ५० | ५० | ५० |
| १४ | ग्रंथालय शुल्क | ५० | ५० | ५० |
| १५ | विद्यार्थी कल्याण शुल्क | २० | २० | २० |
| १६ | राष्ट्रीय सेवा योजना | १० | १० | १० |
| १७ | अश्वमेध | ०४ | ०४ | ०४ |
| १८ | विद्यापीठ/महाविद्यालय क्रिडा निधी | १० | १० | १० |
| १९ | संगणक शुल्क | ५० | ५० | ५० |
| २० | विद्यापीठ पात्रता शुल्क | ५० | ५० | ५० |
| २१ | | | | |
| | एकुण | २३८९ | २७८९ | २३८९ |

प्रत्येक विद्यार्थ्यांने वरील शुल्क देणे आवश्यक आहे. जर वरील शुल्कामध्ये महाराष्ट्र शासन व विद्यापीठ **EIRA** यांनी बदल केल्यास ते आपणास देणे बंधनकारक राहील.

बी.एस्सी.प्रत्येक विषयास प्रयोग शाळा फिस १०००/- रुपये राहिल.शास्त्रशाखेच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळेस सर्व विषयाच्या रेकॉर्डबुकची फिस भरावयाची आहे.

# * अभ्यासक्रम *

## विज्ञान शाखा :– बी.एस्सी.प्रथम वर्ष (सेमिस्टर पध्दत)

**अ) अनिवार्य विषय**

१) इंग्रजी

२) मराठी/हिंदी

**ब) एच्छिक विषय (कोणताही एक ग्रुप)**

१) भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र/गणित

२) रसायनशास्त्र/वनस्पतीशास्त्र/प्राणीशास्त्र

३) रसायनशास्त्र/वनस्पतीशास्त्र/संगणकशास्त्र

४) रसायनशास्त्र/सुक्ष्मजीवशास्त्र/प्राणीशास्त्र

५) रसायनशास्त्र/सुक्ष्मजीवशास्त्र/वनस्पतीशास्त्र

६) रसायनशास्त्र/डेअरीसायन्स/प्राणीशास्त्र

७) रसायनशास्त्र/भौतीकशास्त्र/संगणकशास्त्र